कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

दिनांक :– १९.११.२०२४

**प्रेसनोट**

**आरोपी लोकसेवक माधव देवराव भालेराव व्यवसाय नौकरी, तलाठी, सज्जा फाळेगाव, तहसील कार्यालय हिंगोली रा. प्लॉट कमांक १० भारत नगर, अकोला बायपास, हिंगोली यांनी १,०००/– रू.ची लाच मागणी प्रकरणी गुन्हादाखल केले बाबत.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.१३.११.२०२४ रोजी तक्रार दिली की, लोकसेवक माधव देवराव भालेराव, तलाठी, हे तक्रारदार यांचे आतेभाऊ शंकर झनक पाटोळे हा उजव्या डोळ्याने अपंग असून, त्याच्याकडे अपंग असल्याबाबतचे ४०: चे प्रमाणपत्र आहे. तक्रारदार यांचा आतेभाऊ शंकर झनक पाटोळे याला इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेचे अंदाजे १२०० ते १५०० रुपये मासिक लाभ मिळण्याकरिता फाईल तयार करून, ती तलाठी सज्जा मौजे फाळेगाव यांचे कार्यालयात दिनांक १३.११.२४ रोजी सादर केली असता, फाळेगाव सज्जाचे तलाठी माधव भालेराव यांनी सदर फाईल स्वत:कडे ठेवून घेऊन, फाईलवर त्यांची सही शिक्का देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १००० रुपयाची मागणी केली. त्यावरून दिनांक १३.११.२०२४ रोजी तक्रारदार यांनी तलाठी भालेराव लाचेची मागणी करत असल्याबाबत ला.प्र.वि. हिंगोली येथे रीतसर तक्रार दिली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १४.११.२०२४ रोजी शासकीय पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता, तक्रारदार यांचे आते भाऊ याचे फाईलवर सही शिक्का देण्यासाठी आलोसे माधव भालेराव यांनी तक्रारदार यांचेकडून शासकीय पंचासमक्ष १००० रू लाच रक्कम स्वीकारण्याची सहमती दर्शविली. त्यावरून दिनांक १४.११.२४ रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले, परंतु तलाठी भालेराव यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्यामुळे त्यांनी १००० रुपये लाचेची रक्कम स्वीकारली नाही. तलाठी माधव भालेराव यांनी तक्रारदार यांचे कडून शासकीय पंचासमक्ष १००० रुपये लाचेची रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन त्यांचे विरूध्द पो.स्टे. हिंगोली ग्रमीण येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड व श्री संजय तुंगार,अपर पोलीस अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड श्री विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, अॅ.क.ब्युरो, हिंगोली यांचे मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांनी पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुशकर, एएसआय शेख युनुस, पोहेकॉ तान्हाजी मुंढे, पोहेकॉ श्री ज्ञानेश्वर पंचलींगे, पोहेकॉ श्री विजय शुक्ला, पोहेकॉ श्री भगवान मंडलीक पोहेकॉ श्री गजानन पवार, पोहेकॉ श्री राजाराम फुपाटे, चापोह शेख अकबर अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क.१०६४**, दुरध्वनी क.०२४५६–२२३०५५,
मोबाईल कमांक :– ९८२२२५९९३२.

**पोलीस उप अधीक्षक**
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.